अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

मा.खास सभेपुढील विषय

१ मागील दिनांक २०/४/०५ चे सर्वसाधारण सभेचे व १६/७/०५ तसेच १९/७/०५ रोजीच्या झालेल्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणे

२ दुखवटयाचे प्रस्ताव

३ अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रात जकात वसुली कामी जकात अभिकर्ता नेमुन वसुली करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

४ महिला व बाल कल्याण समितीस समितीचा निर्णय अंतिम असेल अशा बाबतचे अधिकार प्रदान करणेबाबत म.बा.स.ठराव नंबर १ दिनांक २१/५/०५ अंतिम मंजूरीसाठी सादर.

५ अभिन्यास ( लेआऊट ) मंजुर करतांना ठरविलेली अंतर्गत सुधारणा रक्कम महानगरपालिकेत भरणे बाबत मा.सर्वश्री वाकळे बहिरनाथ तुकाराम , विरोधी पक्ष नेता,कानडे अशोक नाथा,बारस्कर पोपटराव जगन्नाथ,यांची यादी व त्यावर ऑफिस रिपोर्ट.

६ डॉ.श्री.जी.जी.जगताप,वैद्यकिय आरोग्याधिकारी यांचे सेवेची सध्या महानगरपालिकेस आवश्यकता नसल्याने त्यांची नेमणुक इतरत्र करणेसाठी मा.शासनास विनंती करणे बाबत मा.श्री.शेळके सुरेश छबुराव,सभागृह नेता यांची दिनांक ६-८-२००५ ची यादी.

७ मा.सभासद यांचे रजेचे अर्ज.

( एन.जी.चत्तर )
नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

खास सभा

नोटीस.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र. १ ( ह ) अन्वये.)

अहमदनगर महानगरपालिका कार्यालय.

दिनांक : ६-८-२००५

श्री./ श्रीमती........................................

सदस्य,

अहमदनगर महानगरपालिका.

यांस -

याद्वारे कळविण्यांत येते की,मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र.१ ( ह ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची खास सभा गुरुवार दिनांक ११-८-२००५ रोजी दुपारी १-०० वाजता महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : विषय पत्रिका व टिप्पणी.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

गुरुवार दि. ११-८-२००५ रोजी दुपारी १=०० वाजता महानगरपालिका सभागृहांत होणां-या खास सभेपुढील विषय पत्रिका.

--÷÷--

१ मागील दिनांक २०/४/०५ चे सर्वसाधारण सभेचे व १६/७/०५ तसेच १९/७/०५ रोजीच्या झालेल्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणे

२ दुखवटयाचे प्रस्ताव

३ अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रात जकात वसुली कामी जकात अभिकर्ता नेमुन वसुली करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

४ महिला व बाल कल्याण समितीस समितीचा निर्णय अंतिम असेल अशा बाबतचे अधिकार प्रदान करणेबाबत म.बा.स.ठराव नंबर १ दिनांक २१/५/०५ व त्यावर ऑफिस रिपोर्ट.

५ अभिन्यास ( लेआऊट ) मंजुर करतांना ठरविलेली अंतर्गत सुधारणा रक्कम महानगरपालिकेत भरणे बाबत मा.सर्वश्री वाकळे बहिरनाथ तुकाराम , विरोधी पक्ष नेता,कानडे अशोक नाथा,बारस्कर पोपटराव जगन्नाथ,या मा.सदस्यांची यादी व त्यावर ऑफिस रिपोर्ट.

६ डॉ.श्री.जी.जी.जगताप,वैद्यकिय आरोग्याधिकारी यांची नेमणुक इतरत्र करणेसाठी मा.शासनास विनंती करणे बाबत मा.श्री.शेळके सुरेश छबुराव,सभागृह नेता यांची दिनांक ६-८-२००५ ची यादी.

७ मा.सभासद यांचे रजेचे अर्ज.

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक : ६-८-२००५.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर.

कृपया टिप्पणी मागील पानावर पहावी.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

गुरुवार दि. ११-८-२००५ रोजी दुपारी १=०० वाजता महानगरपालिका सभागृहांत होणां-या खास सभेपुढील विषया बाबतची टिप्पणी.

| अ.नं. | विषय | टिप्पणी |
|---|---|---|
| १ | मागील दिनांक २०/४/०५ चे सर्वसाधारण सभेचे व १६/७/०५ तसेच १९/७/०५ रोजीच्या झालेल्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणे | नियमाप्रमाणे आहे.इतिवृत्त कायम करणेंस हरकत नाही. |
| २ | दुखवटयाचे प्रस्ताव | टिप्पणी नाही |
| ३ | अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रात जकात वसुली कामी जकात अभिकर्ता नेमुन वसुली करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. | सभेने निर्णय घेणेस्तव. |
| ४ | महिला व बाल कल्याण समितीस समितीचा निर्णय अंतिम असेल अशा बाबतचे अधिकार प्रदान करणेबाबत म.बा.स.ठराव नंबर १ दिनांक २१/५/०५ व त्यावर ऑफिस रिपोर्ट. | सभेने निर्णय घेणेस्तव. |
| ५ | अभिन्यास ( लेआऊट ) मंजुर करतांना ठरविलेली अंतर्गत सुधारणा रक्कम महानगरपालिकेत भरणे बाबत मा.सर्वश्री वाकळे बहिरनाथ तुकाराम , विरोधी पक्ष नेता,कानडे अशोक नाथा,बारस्कर पोपटराव जगन्नाथ,या मा.सदस्यांची यादी व त्यावर ऑफिस रिपोर्ट. | सभेने निर्णय घेणेस्तव. |
| ६ | डॉ.श्री.जी.जी.जगताप,वैद्यकिय आरोग्याधिकारी यांची नेमणुक इतरत्र करणेसाठी मा.शासनास विनंती करणे बाबत मा.श्री.शेळके सुरेश छबुराव,सभागृह नेता यांची दिनांक ६-८-२००५ ची यादी. | टिप्पणी नाही. |
| ७ | मा.सभासद यांचे रजेचे अर्ज. | टिप्पणी नाही. |

दिनांक :६-८-२००५.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १ दि. ११-८-२००५.

••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••

प्रस्तावाचा विषय - मागील दिनांक २०/४/०५ चे सर्वसाधारण सभेचे व १६/७/०५ तसेच १९/७/०५ रोजीच्या झालेल्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणे

-**-

प्रस्तावाचा मजकूर : मागील दि.२०-४-२००५ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे व १६-७-०५ तसेच १९-७-०५ रोजीच्या झालेल्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणेसाठी मा.खास सभेपुढे ठेविले.

मा.खास सभेपुढील चर्चा.:-

१) मा.श्री.गिरवले - मागील दि.१६-७-२००५ च्या सभेपुढे रस्ते विकास योजना राबविणेबाबतचा विषय घेण्यात आलेला होता. तथापी सदर विषयानुसार तज्ञ समिती अधिकारी नेमण्याचा ठराव बाबत सुचना केली असतानाही फक्त नगरसेवकांची समिती नेमण्यात आल्याचे दिसते. यामध्ये फक्त अधिकारी व पदाधिकारी यांचाच समावेश केला आहे. या समितीमधे आमदार व खासदार व नागरीकांचा समावेश करावा. तसेच सार्व.बांधकाम विभाग, बिल्डर्स असोसिएशन यांचा समावेश करावा. अन्यथा या समितीस माझा विरोध नोंदवून घेण्यात यावा.

२) मा.श्री.आगरकर - यांनी सुचविले की, या समितीमध्ये सार्व.बांधकाम विभागाचे निवृत्त अधिकारी यांचा समावेश करावा. तथापी कन्फर्मेशनला विषय आल्यानंतर विरोध नोंदविता येत नाही. जकातीबाबत बोलताना सांगितले की, व्यापा-यांशी हितगुज करुन निर्णय घ्यावा.

३) मा.श्री.कानडे - मागील विषय क्र.४ चे वेळी चर्चेत भाग घेतलेला असताना विचार व्यक्त केलेले होते. परंतु प्रोसिडींग चुकीच्या पध्दतीने लिहीले जाते. मी व्यक्त केलेले विचार प्रोसिडींगमध्ये आलेले नाहीत. तरी याबाबत खुलासा व्हावा. याबाबत मा.महापौर यांनी सुचना दिली की, टेपरेकॉर्ड कॅसेट याच्याशी टॅली करुन प्रोसिडींग लिहीण्यात यावे.

४) मा.श्री.दीप चव्हाण - यांनी मागील सभेतील खाजगीकरणातून बस सेवा चालू करण्याचे विषयाबाबत सांगितले की, परिवहन समिती अस्तित्वात नाही. त्यामुळे हा विषय कोणत्या आधारे घेतला गेला. या विषयासाठी परिवहन समितीची स्थापना करावयास पाहिजे. सदरचा विषय मागील वेळी मंजूर झाला असल्यामुळे त्याबाबत १ महिन्यापर्यंत काय कार्यवाही केली आहे, कार्यपध्दती कोणत्या स्टेजवर आहे. याबाबत मा.प्रभारी आयुक्त यांनी खुलासा केला की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ यामधील परिवहन समिती नेमण्याची तरतूद आहे. तथापी याबाबत कोणतीही बजेट तरतूद केलेली नाही. खाजगी तत्वावरच बससेवा चालविण्याचा प्रस्ताव असल्यामुळे बजेट तरतूद नाही व खर्चाचा प्रस्ताव नाही. उत्पन्न सुरु झाल्यानंतर बजेट तरतूद करण्यात येईल. बस परिवहनबाबत स्थायी समितीकडे अटी व शर्तीबाबत प्रस्ताव ठेवण्यात येउन याबाबत अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर तात्काळ कार्यवाही करण्यात येईल.

५) मा.श्री.अनंत जोशी - यांनी सांगितले की, नागरिकांचा जिव्हाळयाचा प्रश्न असताना सुध्दा बससेवा बाबत कार्यवाही झालेली नाही. नागरिकांना हालअपेष्टांना तोंड दयावे लागत आहे. बस परिवहन सेवा

२० सप्टेंबर २००५ पर्यंत सुरु करावी, असे सुचविले. त्यावर उपायुक्त श्री.देशमुख साहेब यांनी सांगितले की, अटी व शर्तीबाबत त्वरीत प्रस्ताव तयार करुन स्थायी समितीपुढे ठेवून निविदा प्रक्रिया पार पाडण्यात येईल.

६) मा.सौ.मंगला गुंदेचा - महिला व बाल कल्याण समितीचे सभापतींना वाहन देण्यात यावे. याबाबत मा.महापौर यांनी सांगितले की, यापूर्वी बजेटचा प्रश्न होता. पुढील मिटींगपूर्वी वाहन उपलब्ध करुन देण्यात यावे, असे सांगितले.

७) मा.सौ.दहिफळे - यांनी सुचविले की, महिला व बाल कल्याण समितीचे सभापतींना सिटी इंजिनिअर यांचेप्रमाणे भाडयाने वाहन देणे किंवा स्वतःची गाडी वापरली तर भत्ता देण्यात यावा.

वरील चर्चेनंतर मागील इतिवृत्त मंजूर करण्यात आले.

ठराव - संपूर्ण कार्यवृत्तावर चर्चा करण्यात येवून दि.२०-४-२००५ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे आणि दि.१६-७-२००५ व दि.१९-७-२००५ रोजी झालेल्या खास सभेचे इतिवृत्त कायम करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक : मा.श्री.सुरेशराव शेळके

अनुमोदक : मा.श्री.अनंत जोशी

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

प्रस्ताव क्रमांक :३ दि. ११-८-२००५.

........................................................................

प्रस्तावाचा विषय - अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रात जकात वसुली कामी जकात अभिकर्ता नेमुन
वसुली करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

-**-

प्रस्तावाचा मजकूर : विनंती रिपोर्ट की, मे.शासनाचे दिनांक ३१ मार्च २००५ रोजीचे पत्रानुसार अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रात जकात कर लागू करणे,त्याबाबतचे धोरण ठरविणे तसेच जकात नियमाच्या मसुदयास मान्यता देणे व जकात वसुली कामी जकात अभिकर्ता नेमणूक करणे असे स्वतंत्ररित्या प्रस्ताव दिनांक १६/७/२००५ रोजीचे महानगरपालिका सभेपुढे निर्णयास्तव ठेवण्यात आले.याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय झाला.

१. महानगरपालिका ठराव क्रमांक १ (अ ) दिनांक १६/७/०५ " जकात कर याच वर्षात सुरु करणेबाबत प्रशासनाने पाठपुरावा केला आहे. प्रशासनाने कलम १०४ प्रमाणेही प्रस्ताव स्थायी समितीला दिला आहे. कलम १०४ व १५० अन्वये चालू वर्षाच्या उर्वरीत कालावधीत कर लावण्यास महानगरपालिका सक्षम असल्याने सत्वर जकात लावणेस मंजूरी देणेत येत आहे.त्याचप्रमाणे नियमांच्या मसुदयासही व स्थायी आदेशासह आवश्यक तरतूदीसह आवश्यक सुधारणासह मंजूरी देण्यात येत आहे. आयुक्तांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करावी.तात्काळ जकात सुरु करणेबाबत प्रक्रिया पार पाडावी "

२. महानगरपालिका ठराव क्रमांक १ ब दिनांक १६/७/०५ " जकात नियमांना शासनाची मान्यता प्राप्त झाल्यावर कर्मचा-यामार्फत आयुक्तांनी त्वरीत जकात वसुली सुरु करावी व अभिकर्ता नेमणूकीसाठी विषय तात्काळ खास सभेपुढे सादर करावा "

महानगरपालिका ठराव क्रमांक १ अ अन्वये अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रात जकात कर लागू करणेव जकात नियमांच्या व स्थायी आदेशाच्या अंतिम मसुदयास मान्यता मिळणेबाबत इकडील पत्र जा.क्र.साप्रवी जकात ११८२ व ११८३ दिनांक २२/७ /२००५ अन्वये प्रस्ताव मे.महाराष्ट्र शासनाकडे अंतिम मंजूरीसाठी पाठविण्यात आला.

यावर मे.महाराष्ट्र शासनाने त्यांचेकडील आदेश क्रमांक महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग - शासन - निर्णय क्रमांक अमपा / १००५ / १२९० - १२९१ / प्र.क्र.३२५ / २००५ / नवि - २४ मुंबई दिनांक २७ जुलै २००५ अन्वये "अहमदनगर महानगरपालिका जकात नियम व स्थायी आदेशास " मंजुरी देवून सदर नियम मंजूरी आदेशाच्या तारखेपासून एक महिन्यानंतर अमलात येतील असे कळविले आहे.

मुंबई प्रातिंक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४९ (३) अन्वये मा.राज्य शासनाचे मंजूरीनंतर ३० दिवसानंतर अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रात जकात कर लागू करता येईल.मे शासनाने उक्त आदेशानुसार दिनांक २७ जुलै २००५ रोजी महानगरपालिका जकात कर लागू करणेस मंजूरी दिलेली आहे.म्हणजेच मुंबई प्रातिंक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४९ (३) नुसार दिनांक २६ ऑगस्ट २००५ रोजी रात्री २४.०० वा.पासून अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रात अहमदनगर महानगरपालिका जकात नियम २००५ अन्वये जकात वसुली करता येईल.

महानगरपालिका सभा ठराव क्रमांक १ ब अन्वये अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रात जकात वसुली कामी जकात अभिकर्ता नेमणूक करावयाची झाल्यास मुंबई प्रातिंक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची " ड "प्रकरण ८ कराधान नियम ३५ अन्वये कोणत्याही एक वर्षाचे कालावधीसाठी जकात वसुली कामी जकात अभिकर्ता नेमणूक करता येईल.

अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रात जकात कर वसुलीकामी " जकात अभिकर्ता " नेमणूक मे.शासन आदेश क्रमांक एम.एम.ए.१०९४ / प्र.क्र.३/९४/ नवि - ३२ दिनांक २८ फेब्रुवारी १९९४ मधील तरतूदीनुसार करावी लागेल.

मे.शासनाचे वरील आदेशानुसार कोणत्याही एका वर्षासाठी जकात अभिकर्ता नेमणूक करणेसाठी पहिल्या वर्षासाठी किमान देकार रक्कम ची गणना करण्यासाठी त्याचे गत तीन वित्तीय वर्षापैकी ज्या वर्षाचे जकातीपासून जास्त उत्पन्न मिळाले असेल ती रक्कम २० % ने वाढवावी व त्यामध्ये जकात वसुलीसाठी नेमलेल्या कर्मचारी व अधिकारी यांचे पगारावर झालेल्या खर्चाच्या ५०% रक्कम मिळवावी. व अशा बेरजेनंतर जी रक्कम येईल ती रक्कम किमान देकार रक्कम

म्हणून निश्चित करण्यात यावी.व त्यानंतर प्रत्येक वर्षाच्या निविदासाठी सदरची रक्कम १५% ने वाढवून येणारी रक्कम किमान देकार रक्कम म्हणून ठरविण्यात यावी.

मे शासनाचे ३० जुन २००३ चे आदेशानुसार भुतपुर्व अहमदनगर नगरपरिषदेचे अहमदनगर शहर महानगरपालिकेत रुपांतर होउत्न अहमदनगर महानगरपालिका अस्तित्वात आली.व जिल्हा परिषद क्षेत्रातील केडगांव,बुरुडगांव,नागापुर,फकीरवाडा,दर्गादायरा,माळीवाडा, चाहुराणा खुर्द ,बुद्रुक ,मोरचुदनगर,नालेगांव,बोल्हेगांव,सावेडी ,भिस्तबाग या गावांचा महानगरपालिका हद्यीत समावेश झाला.त्यामुळे अहमदनगर शहराचे क्षेत्र १८२९ हेक्टर क्षेत्रावरुन आता ८३२१.३४ हेक्टर झाले.व लोकसंख्येतही वाढ झाली.

जनगणनेनुसार लोकसंख्येचा तपशिल.

| अ.क्र | लोकसंख्या क्षेत्र | सन १९९१ चे जनगणनेनुसार | सन २००१ चे जनगणनेनुसार |
|---|---|---|---|
| १ | सन १९९९ पुर्वी नगरपरिषद हद्यीत समाविष्ठ क्षेत्र | १,८१,३३९ | २,०७,४२८ |
| २ | सन १९९९ नंतर समाविष्ठ क्षेत्र | ५३,१०२ | १,००,१८७ |
| | एकूण | २,३४,४४१ | ३,०७,६१५ |

भुतपुर्व नगरपरिषद अस्तीत्वात असतांना जकात क्षेत्रामध्ये वरील नव्याने समाविष्ठ झालेल्या १२ गावांचा समावेश नव्हता. त्यामुळे नव्याने समाविष्ठ झालेल्या वाढीव क्षेत्राचा विचार करुन मे.शासनाकडून अनुदानाची रक्कम प्राप्त होत नव्हती.त्यामुळे किमान देकार रक्कम निश्चित करतांना मे.शासनाचे वरील मार्गदशर्क तत्वाव्यतिरिक्त आणखी हद्यवाढ व वाढीव ४८.३० % लोकसंख्या वाढीचा विचार करुन किमान देकार रकक्म निश्चित करणे उचीत होईल.

सन २००५ व २००६ मधील कोणत्याही एक वर्षाचे कालावधीसाठी किमान देकार रक्कम खालील प्रमाणे निश्चित करावी लागेल.

| अ.क्र | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १ | मागील ३ वर्षातील सर्वात जास्त उत्पन्न (मे.शासनाकडून जकातीपोटी मिळणारे अनुदानाची रक्कम ) | १८,३२,७९,०००/- |
| २ | सन २००१ च्या जनगणनेनुसार ४८.३० % लोकसंख्या वाढ व हद्यवाढीचा मुददा विचारात घेवून अंदाजीत होणारी वाढ | ८,८५,२३,७५७/- |
| ३ | वरील रकमेच्या शेकडा २०% वाढ (अ.नं १ व २ चे बेरजेच्या ) | ५,४३,६०,५५१/- |
| ४ | जकात आस्थापना खर्चाचे ५० % रक्कम | ५०,००,०००/- |
| | एकूण किमान देकार रक्कम | ३३,११,६३,३०८/- |

अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रात सन २००५ व सन २००६ या वर्षातील कोणत्याही एक वर्षाचे कालावधीसाठी जकात वसुलीकामी जकात अभिकर्ता नेमणूक करावयाची झाल्यास वरीलप्रमाणे एक वर्षासाठी किमान देकार रक्कम रुपये ३३,११,६३,३०८/- (रू.तेहतीस कोटी अकरा लक्ष त्रेसष्ठ हजार तिनशे आठ फक्त) एवढया रकमेस ठेका दयावा लागेल.कुठल्याही परिस्थितीत यापेक्षा कमी रकमेस ठेका देता येणार नाही.

जकात अभिकर्त्यांने महानगरपालिकेच्या अनुभवी जकात कर्मचा-याची मागणी केल्यास मागणीनुसार संपुर्ण पगार आगाउ भरण्याच्या अटीवर महानगरपालिका कर्मचा-याच्या सेवा , लोन तत्वावर उपलब्ध करुन देता येतील.मा.आयुक्तांचे मंजूरीनुसार आवश्यकतेनुसार अभिकर्त्यास चेक पोस्ट उभारता येतील. जकात नाक्यावरील लाईट बिले,टेलीफोन बिले अभिकर्त्यास भरावी लागतील.मात्र अहमदनगर महानगरपालिकेस जकात,परिवहन पास, इत्यादी सर्व प्रकारची पावती पुस्तके, विविध नमुने,नोंदवहया इ. विनामुल्य जकात अभिकर्त्यास पुरवावी लागतील.

सबब अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रात जकात वसुलीकामी दिनांक २७ /०८/२००५ ते २६ /०८/२००६ अशा एक वर्षाच्या कालावधीसाठी किमान देकार रक्कम रुपये ३३,११,६३,३०८/- (रू.तेहतीस कोटी अकरा लक्ष त्रेसष्ठ हजार तिनशे आठ फक्त)एवढया रकमेस जकात अभिकर्ता नेमणूक करणेबाबतचा प्रस्ताव उचीत निर्णयासाठी सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, अहवालानुसार व ठराव क्र.१ (ब) दिनांक १६-७-२००५ नुसार अभिकर्ता नियुक्तीसाठी विषय सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेंस शिफारस आहे.

यावर मा.आयुक्त साो.यांचा अभिप्राय की, जकात वसुलीसाठी खाजगी अभिकर्ता नियुक्तीसाठी किमान देकार प्रस्तावित केलेप्रमाणे निश्चिीत करून कार्यालयीन प्रस्तावास मा.महासभेची विशेष बैठक घेउत्न मान्यता देणेंस हरकत नाही.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (सा) व मा.आयुक्त साो.यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

चर्चा :

१) मा.श्री.सुळ - जकात अभिकर्ता नेमणेचा विषय घेतलेला आहे. याबाबतच्या अटी व शर्तीमधील ठेक्याची देकार रक्कम ३३ कोटी ११ लाख ६३ हजार ३०८ घेतलेली आहे. त्याचप्रमाणे जकात नाके चालविण्यासाठी महानगरपालिका आस्थापनेवरील ५० टक्के कर्मचारी घ्यावेत, असे सुचविले. दि.२८ ऑगस्ट पासून वसुलीसाठी अभिकर्ता नेमला न गेल्यास वसुली कशी करणार. वसुली महानगरपालिकेने केली तरच देकार रकमेचा प्रश्न येईल. त्यावर मा.प्रभारी आयुक्त यांनी खुलासा केला की, जकात ठेकेदार यांना महानगरपालिकेचे कर्मचारी घेणेबाबत सक्ती करता येत नाही.

२) मा.श्री.गव्हाळे - महानगरपालिकेकडे कर्मचारी असताना जकात ठेका कशासाठी दयावयाचा? त्यावर मा.महापौर यांनी याबाबत खुलासा केला की, इतर महानगरपालिकांच्या जकात उत्पन्नाबाबतचा विचार केलाअसता जास्त रक्कम मिळु शकते. त्यामुळे वसुलीबाबतचा ठेका देणे योग्य आहे, असे सांगितले.

३) मा.श्री.मुदस्सर शेख - वसुलीबाबत ठेकेदाराकडून व्यापा-यांना त्रास होत असल्यामुळे महानगरपालिकेने स्वत: जकात वसुली करावी. अन्यथा ठेकेदाराकडून वसुली करणेसाठी आमचा विरोध नोंदवावा.

४) मा.श्री.दीप चव्हाण - मा.शासनाने फक्त नियमांना मंजुरी दिलेली आहे. त्यामुळे जकात लावता येत नाही. मनपा कायदा कलम १०४ अन्वये स्थायी समितीपुढे प्रस्ताव पाठविलेला होता. तेव्हा सर्वसाधारण सभेपुढे घेतलेला विषय बेकायदेशीर आहे. त्यास आमचा विरोध आहे. त्यावर प्रभारी आयुक्त यांनी खुलासा केला की, प्रस्ताव स्थायी समितीपुढे सादर करण्यात आला होता. असे सांगितले होते. त्यावर मा.श्री.दीप चव्हाण यांनी सांगितले की चुकीच्या पध्दतीने निर्णय झालेला असेल तर विरोध करण्याची आम्हाला हौस नाही. शासनाकडून आलेले पत्रानुसार जकात नियमांना मंजुरी आलेली आहे. त्यामुळे जकात लावता येत नाही. हा विषय बेकायदेशीर आहे. त्यास आमचा विरोध आहे.

इतर महानगरपालिकांमध्ये जकातीबाबत ठरावीक लोकच ठेका घेतात. व ते नागरीक व व्यापारी यांना त्रास देतात, असा अनुभव आहे. त्यामुळे अभिकर्ता नेमण्यास आमचा विरोध आहे. नगरसेवकांना ज्या वेळेस टेंडर फॉर्मच्या नमुने पाठविण्यात आले आहेत. हे नमुने इंग्रजीमध्ये आहे. हे नमुने आत्ताच का पाठविण्यात

आले. यापुर्वी असे टेंडर फॉर्म नमुने पाठविले जात नव्हते. मराठीमध्ये नमुने का पाठविले नाही? यावर मा.प्रभारी आयुक्त यांनी असा खुलासा केला की, जकातीबाबतच्या टेंडरचा वेगळा विषय असल्यामुळे मुददाम माहितीसाठी पाठविण्यात आला आहे. कलम १२७ (२) नुसार पत्राने शासनाने स्पष्ट केले आहे की, १ महिन्यानंतर जकात लावण्यास महानगरपालिका सक्षम आहे. तरीही आमचा विरोध नोंदवून घ्यावा, असे मा.श्री.दीप चव्हाण यांनी सांगितले.

५) मा.सौ.मंगला गुंदेचा - ठेका पध्दतीने दिल्यास व्यापा-यास त्रास होईल. तरी जकात महानगरपालिकेने वसुल करावी. त्यावर मा.महापौर यांनी सांगितले की, कोणासही त्रास होणार नाही अशा प्रकारे दक्षता घेउ.

६) मा.श्री.कैलास गिरवले - अभिकर्ता नेमणेबाबत आमची मागणी आहे. कोणाचा विरोध असल्यास तो नोंदवून घेण्यात यावा. महानगरपालिकेने जकात नाके चालवून वसुली करणे हा दुर्देवी प्रकार होईल. व प्रामाणीक कर्मचारी यांचे जिवाशी खेळ होईल. अपेक्षीत उत्पन्न मिळणार नाही. यापुर्वी जकात चोरीच्या अनेक घटना घडल्या. व कर्मचा-यांचे जिवावर बेतले आहे. व्यापा-यांशी याबाबत चर्चा केली आहे. ठेकेदारी पध्दतीनेच जकात वसुल करावी,असे त्यांचे मत आहे. व्यापारी स्वतः जकात भरीत नाही. त्यामुळे अभिकर्त्यामार्फतच जकात वसुली करावी,असे मत आहे.

७) मा.श्री.अनंत जोशी - ठेकेदारामार्फत जकात वसुली करीत असताना त्यांचे वर्तनाबाबत आदर्श आचार संहिता लावण्यात यावी. त्यामुळे हा प्रश्न निर्माण होणार नाही.

८) मा.श्री.अभय आगरकर - यांनी २ सुचना मांडल्या. १.कॅन्टोन्मेंट बोर्डाचे हददीमध्ये नगरपालिकेच्या वतीने जकात वसुली केली जात होती. व त्याबाबत कॅन्टोन्मेंटला मोबदला देण्यात येत होता. यापूर्वी वार्षिक ५० लाख रुपये शेवटी मोबदला देण्यात येत होता. त्याबाबत आताच्या प्रस्तावामध्ये प्रोव्हीजन केलेली नाही असे दिसून येते. त्याबाबतही योग्य तो निर्णय घ्यावा. २.अभिकर्ता नेमल्यानंतर एस.टी.स्टॅण्ड, रेल्वेस्टेशन इ. ठिकाणी महिला व नागरिकांचे बॅगा तपासणे याबाबत अडवणूक होउ नये यासाठी आचारसंहिता करावी व त्याची दखल घ्यावी, अशी विनंती केली.

९) मा.श्रीमती.दिघे - ठेकेदारी पध्दतीने जकात वसुल करु नये. महिलांना रात्री अपरात्री त्रास होईल.

१०) मा.श्री.नामदेव पवार - जकात ठेकेदारी पध्दतीने देण्यासाठी काही अटी व शर्ती आहेत काय? आचार संहिता केलेली आहे काय? नियमावली केलेली आहे काय? असे विचारण्यात आले. यावर प्रभारी आयुक्त यांनी खुलासा केला की, नियमामध्ये सर्व तरतूद केली आहे.

११) मा.श्री.उडाणशिवे - यांनी सांगितले की, अन्नधान्य, भाजीपाला, दूध हे जकातीमधून वगळणेत यावेत. त्याचप्रमाणे ठेकेदारीने जकात वसुल करण्यास विरोध आहे.

१२) मा.श्री.संदिप कोतकर - कोणत्या वस्तु जकातीमधून वगळावयाच्या यावर चर्चा करणार आहे किंवा कसे? यावर मा.महापौरयांनी खुलासा केला की, कोणत्या वस्तू वगळलेल्या आहेत. त्याची अनुसुची २ मध्ये यादी दिलेली आहे. आता फक्त अभिकर्ता नेमणेबाबत निर्णय घ्यावयाचा आहे.

१३) मा.श्री.त्रिपाठी - महानगरपालिकेकडे २७५० कर्मचारी आहेत. महानगरपालिका ठेका देणारच आहे. तेव्हा महानगरपालिकेचे कर्मचारी वसुलीकामी नेमण्यात यावेत. महापौर यांनी नोंद करणेबाबत सुचना दिली.

१४) मा.श्री.मिलींद गंधे - अभिकर्ता नेमणेबाबत मांडलेल्या प्रस्तावास अनुमोदन देउन सदर प्रस्ताव मंजूर करावा असे सांगितले.

शेवटी मा.महापौर यांनी मा.सदस्यांनी मांडलेल्या सर्व सुचना लक्षात घेउन ठेकेदारी पध्दतीचा कोणताही त्रास होणार नाही, अशा अटी व शर्ती नमूद करुन तसेच कॅन्टोन्मेंट बाबत योग्य तो विचार करुन सदरचा प्रस्ताव मंजूर करण्यात यावा असे आवाहन केले. व मंजूर झाल्याचे जाहीर केले.

-- * --

**ठराव :** ऑफिस प्रस्तावानुसार जकात अभिकर्ता नियुक्तीस व त्यासाठीच्या अटी शर्तींना मंजुरी देण्यांत येत आहे. आयुक्तांनी त्वरीत अभिकर्ता नियुक्तीसाठी कार्यवाही करावी. सन १९९९ पुर्वी तत्कालीन नगरपरिषद व अहमदनगर कॅन्टोन्मेंट बोर्ड संयुक्तपणे जकात वसुल करत होते. त्यामुळे भविष्यात असा निर्णय झाल्यास अभिकर्ता नियुक्तीच्या अटीशर्ती मध्ये कॅन्टोन्मेंन्टला देय ठरणांरी रक्कमेपैकी ठेकेदारीच्या काळातील देय रक्कम अभिकर्त्यास अतिरिक्त रक्कम देकार रक्कमेपेक्षा जास्त द्यावी लागेल अशी अटी शर्तीत तरतूद करावी. तसेच त्यास कॅन्टोन्मेंटचे क्षेत्रात नियमानुसार जकात वसुलीचेही अधिकार देण्यांत यावेत.

सुचक : मा.श्री.दिपक वसंत सुळ

अनुमोदक : मा.श्री.मिलिंद सदाशिव गंधे.

ठराव बहुमताने मंजुर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

प्रस्ताव क्रमांक : ४ दि. ११-८-२००५.

प्रस्तावाचा विषय - महिला व बाल कल्याण समितीस समितीचा निर्णय अंतिम असेल अशा बाबतचे अधिकार प्रदान करणेबाबत म.बा.स.ठराव नंबर १ दिनांक २१/५/०५ अंतिम मंजूरीसाठी सादर.

-**-

प्रस्तावाचा मजकूर : मा.सभापती महिला व बालकल्याण समिती अहमदनगर महानगरपालिका, यांनी दिनांक ४-४-२००५ रोजी इकडेस यादी देऊन शासन महिला व बालविकास विभाग ,नगर विकास विभाग,आणि इतर महाराष्ट्र शासनाच्या विविध खात्याकडे महिला व बालकल्याण विकासाबाबत जे प्रस्ताव प्रशासनामार्फत महिला व बालकल्याण समितीपुढे सादर करण्यांत येतील, अशा सर्व बाबतीत महिला व बालकल्याण समितीचा निर्णय अंतिम असेल असे महानगरपालिकेने अधिकार प्रदान करण्यांसाठी सदर प्रस्ताव महासभेमध्ये मंजुरीस्तव ठेवण्यांसाठी विनंती करण्यांत आली आहे.

तसेंच दिनांक २१-५-२००५ रोजी घेण्यांत आलेल्या महिला व बालकल्याण समितीच्या सभे मध्ये उपरोक्त विषय घेण्यांत आला असुन, सदर बाबत पुढील प्रमाणे ठराव करण्यांत आलेला आहे.

" ठराव - अहमदनगर महानगरपालिकेच्या महिला व बाल कल्याण समितीपुढे मा.सभापती,महिला व बाल कल्याण समिती यांची यादी ठेवली असता,सदर यादीवर साधकबाधक चर्चा होऊन सदर समितीने असा निर्णय घेतला की,महिला व बाल कल्याण समितीने घेतलेला निर्णय अंतिम असेल अशा बाबत महानगरपालिकेने सदर समितीस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम चे कलम ३० (६) अन्वये अधिकार प्रदान करणे विषयी कार्यवाही करावी. अखेर मान्यतेसाठी मा.सर्वसाधारण सभेकडेस सादर. ठराव सर्वानुमते मंजुर. "

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम चे कलम ३० (२) अन्वये महानगरपालिकेस तिच्या सभेत उपस्थित असलेल्या व मत देणा-या पालिका सदस्यांपैकी कमीत

कमी दोन तृतीयांश पालिका सदस्यांनी मत देऊन पारित केलेल्या विशिष्ट ठरावाद्धारे प्रत्येक विशेष समितीच्या कामकाजाचे क्षेत्र निश्चित करता येईल आणि अशा कोणत्याही क्षेत्रात समाविष्ठ केलेल्या सर्व बाबी व प्रश्न प्रथमतः समुचित समितीपुढे ठेवले पाहीजेत व ते अशा समितीच्या शिफारशींसह महानगरपालिकेस सादर केले पाहीजेत असा निर्देश देता येईल.तसेच महानगरपालिकेस तशाच ठरावाद्धारे आपले अधिकार व कर्तव्ये यापैकी कोणतेही अधिकार व कर्तव्ये विनिर्दिष्ट केलेल्या विशेष समित्यांकडे प्रत्यायोजित करता येतील.

तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम चे कलम ३० (६) अन्वये प्रत्येक विशेष समितीचे सर्व कामकाज महानगरपालिकेकडून कायम केले जाण्याच्या अधीन असेलः

परंतू पोट-कलम (२) अन्वये आपले अधिकार व कर्तव्ये यांपैकी कोणतेही अधिकार किंवा कर्तव्ये विशेष समित्यांकडे सोपवतांना महानगरपालिकेने अशा समितीचा निर्णय अंतिम असेल असा निदेश दिला असेल तर,अशा समितीच्या कामकाजापैकी असे अधिकार व कर्तव्ये या संबंधीचे कामकाज महानगरपालिकेकडून कायम केले जाण्याच्या अधिन राहणार नाही. मात्र अशा निर्णयास अशा समितीच्या एकूण सदस्यापैकी निदान दोन तृतीयांश सदस्यांनी पाठिंबा दिलेला असला पाहिजेः

आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा ) यांचा अभिप्राय की, अहवालानुसार निर्णयास्तव सादर.

यावर मा.आयुक्त सो.यांचा अभिप्राय की, विशेष समित्यांना अधिकार प्रदान करणेची तरतुद कलम ३० ,मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमांत पोट कलम (२)(६) मध्ये स्पष्ट आहे. सदरचे समितीचे कामकाज प्रभावी आणि सक्षम होणेसाठी उपरोक्त तरतूदी विचारात घेता

अधिकार प्रदान करणे आवश्यक आहे. अधिकार व सत्तेचे विकेंद्रीकरण हा लोकशाही,लोकाभिमुख शासन प्रणालीतील महत्वाचा घटक आहे. सबब उपरोक्त समितीस अधिनियमांत अपेक्षिलेले अधिकार प्रदान करणेंस हरकत नाही.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा. उपायुक्त (सा ) व मा.आयुक्त साो.यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

--*--

चर्चा :

मा.श्री.सुरेश शेळके - यांनी सांगितले की, या प्रस्तावाबाबत धुळे, मालेगांव, जळगांव इ. महापालिकांकडे माहिती घेउन शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करुन घेण्याबाबत सुचविले. त्यानंतर मा.श्री.मिलींद गंधे यांनी सदर प्रस्तावास अनुमोदन दिले.

--*--

ठराव : सदर विषयाबाबत इतर महानगरपालिकांची माहिती मागविण्यांत यावी. व शासन निर्णयाप्रमाणे कामकाज करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर.

सुचक : मा.श्री.सुरेश शेळके,

अनुमोदक : मा.श्री.मिलिंद गंधे.

सही/-<br>
महापौर,<br>
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

प्रस्ताव क्रमांक : ५ दि. ११-८-२००५.

••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••

प्रस्तावाचा विषय - अभिन्यास ( लेआऊट ) मंजुर करतांना ठरविलेली अंतर्गत सुधारणा रक्कम महानगरपालिकेत भरणे बाबत मा.सर्वश्री वाकळे बहिरनाथ तुकाराम , विरोधी पक्ष नेता,कानडे अशोक नाथा,बारस्कर पोपटराव जगन्नाथ,यांची यादी व त्यावर ऑफिस रिपोर्ट.

-**-

प्रस्तावाचा मजकूर : ( उपरोक्त विषयाबाबत मा.श्री.बहिरनाथ तुकाराम वाकळे, विरोधीपक्ष नेता व मा.श्री.कानडे अशोक नाथा, श्री.पोपटराव बारस्कर,नगरसेवक यांनी दिनांक ४/८/२००५ रोजी दिलेल्या यादीबाबत खालीलप्रमाणे अहवाल सादर करीत आहेत.

१) सन १९९४ पुर्वी तत्कालीन अहमदनगर नगरपरिषद असतांना रेखांकनास तात्पुरती मंजूरी देण्यापुर्वी संबंधीत विकास कर्त्याकडून विशिष्ट अनामत रक्कम वसुल करुन रेखांकनातील रस्ते व गटार बांधण्याची जबाबदारी टाकलेली असे.विकास कर्त्याने रस्ते व गटारी पुर्ण केल्याची खात्री केल्यानंतर सदर रेखांकनास अंतीम मंजूरी दिली जात असे व त्याच वेळेस त्यांची अनामत रक्कम परत केली जात असे.

२) वरीलप्रमाणे प्रचलीत असलेल्या पध्दतीत रस्त्यांची कामे निकृष्ठ होतात तसेच गटारीचे नियोजन योग्यरित्या होत नाही. या व इतर अशा कारणासाठी तत्कालीन नगरपरिषदेने विशेष महासभा आयोजीत करुन ठराव क्रमांक २ फ दिनांक १९/२/९४ रोजी असा निर्णय घेतला की,उपरोक्त प्रचलीत पध्दती बंद करुन रेखांकनातील प्रस्तावीत रस्त्यांची व गटारींची पुर्ण अंदाजीत रक्कम मनपा फंडात भरावी. तसेच रस्ते व गटारी मनपाने स्वतः बनवावे.

३) वरीलप्रमाणे ठराव झालेनंतर ठराव क्रमांक २३ दिनांक ७/७/९५ अन्वये उपरोक्त रकमेसाठी बँकेमध्ये स्वतंत्र खाते उघडून अंतर्गत सुधारणा निधी स्वतंत्र उभा करावा. व त्यामधून वरील कामे प्राधान्याने करावीत असे ठरले.

४) उपरोक्त पध्दतीबाबत विकास कर्त्याकडून व बांधकाम व्यवसायीकाकडून मोठया प्रमाणात तक्रारी आल्याने दिनांक १४/२/९७ रोजी मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांनी बैठक आयोजित केली. या बैठकीस मा.संचालक,नगररचना महाराष्ट्र राज्य, पुणे. मा.नगराध्यक्ष,अहमदनगर नगरपालिका तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी हजर होते.या बैठकीत रेखांकनातुन अंतर्गत रस्ते व गटारी हया बाबी विकास कर्त्यानेच करणे योग्य व आवश्यक राहील.असा निर्णय घेण्यात आला.या निर्णयाच्या अनुषंगाने सदर प्रस्ताव पुन्हा स्थायी समितीपुढे सादर केला असतांना स्थायी समितीने ठराव क्रमांक ९९ दिनांक १०/१२/९८ अन्वये रेखांकनातील अंतर्गत रस्ते व गटारी यांचे अंदाजीत रककम मनपा फंडात जमा करणेचे योग्य राहील.असा ठराव केला.त्या अनुषंगाने सदर प्रस्ताव तत्कालीन सर्व साधारण सभेपुढे आला असता सभेने ठराव क्रमांक २१ दिनांक ५/५/९९ अन्वये स्थायी समितीची शिफारस मंजूर केली व अंतर्गत रस्ते गटारीची अंदाज पत्रकीय संपुर्ण रक्कम मनपा फंडात जमा करणेविषयी ठरले तसेच अंदाजपत्रकीय रकमेत प्रतीवर्षी १०% वाढ करुन हि रक्कम आकारण्यात यावी असेही ठरले.

५) त्यानंतर पुन्हा म्हणजे सन २००३ मध्ये विकास कर्त्याच्या राज्य व्यापी संघटनेत उपरोक्त पध्दत चुकीची असल्याचे नमुद करुन पुर्वी प्रमाणेच रस्ते व गटारी करण्याची जबाबदारी संबधीत विकास कर्त्यावर टाकावी.अशी विनंती केली.त्याच्या पृष्टर्थ त्यांनी सोलापूर महानगरपालिका व नाशिक महानगरपालिका अवलंबीत असलेल्या पध्दतीबाबत माहिती दिली. त्यांच्या प्रस्तावावर सांगोपांग विचार करुन तत्कालीन मा.आयुक्त यांनी प्रशासकीय ठराव क्रमांक १४१ दिनांक ३/११/२००३ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

रेखांकनास तात्पुरत्या स्वरुपाची मंजूरी देतांना अंतर्गत सुधारणेपोटी एकूण अंदाजीत रकमेच्या ३ % रक्कम सुपरव्हीजन चार्जेस म्हणून घेण्यात यावी.व मनपाच्या सुपरव्हीजन खाली विकास कर्त्याने ही कामे पुर्ण करावीत.विकास कर्ता अशी विकास कामे करण्यांस तयार नसेल तर विकास कामांसाठीचा पुर्ण अंदाजीत खर्च त्यांच्याकडून वसूल करण्यांत यावा.

६ ) वरीलप्रमाणे प्रशासकीय ठराव झालेला असला तरी सध्याचे मा.आयुक्त साहेब यांनी गटारीचे नियोजन योग्य प्रकारे होणेसाठी विशेषतः गटारीचा स्लोप,आकार, विसर्ग, इ.योग्य

रितीने होण्यासाठी गटारीची संपुर्ण रक्कम मनपा फंडातच जमा करणेविषयी सुचीत केलेले आहे.व रस्त्यांचे सुपरव्हीजन चार्जेस घेण्याविषयी सुचीत केलेले आहे.

विभागाचा अभिप्राय - सध्याच्या मा.आयुक्त साहेब यांनी सुचीत केलेली कार्यपध्दती योग्य असली तरीही अंतर्गत रस्त्यांच्या दर्जाबाबत सन्मानीय सदस्यांनी शंका उपस्थित केलेली आहे.अंतर्गत रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे व विशेषतः म.न.पा च्या देखरेखीखाली होत नाही.अशी तक्रार आहे.वास्तविक सुपरव्हीजन चार्जेस भरल्यानंतर म.न.पा च्या पर्यवेक्षणाखालीच रस्त्यांची कामे होणे अपेक्षित आहे.सन्मानीय सदस्यांनी विशिष्ट प्रकरणाचा अथवा अंतर्गत रस्त्यांचा उल्लेख केलेला नाही.यादी सर्व साधारण शहरात होणा-या विकासासंबंधी आहे.सदर बाब धोरणात्मक असल्याने याबाबत मा.महासभेत निर्णय होणे आवश्यक आहे.सबब सदर विषय मा.महासभेत सादर होणेस विनंती आहे.आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त ( कर ) यांचा अभिप्राय की,

सदर बाब धोरणात्मक असल्यामुळे निर्णयासाठी मा.महासभेपुढे ठेवणे योग्य.

यावर मा.आयुक्त साो.यांचा अभिप्राय की,रेखांकनाचे बाबतीत अंतर्गंत रस्ते विकास संबंधित विकास कर्त्यामार्फतच केली जातात. याबाबतचे धोरणांत बदल करावयाचा झाल्यास संबंधितांकडुन अंतर्गंत रस्त्यापोटी जमा होणां-या निधीतुन प्रस्तावित काम विशिष्ट कालावधीत आणि ज्या कामासाठी निधी जमा केला त्याच कामांसाठी वापरणे आवश्यक आहे. सदरचे रस्त्याच्या विकासाकरीता जमा करावयाचे निधी बाबत ही प्रचलीत मंजुर डी.एस.आर.(पी.डब्ल्यू.डी.) प्रमाणे निकष ठरविणे आवश्यक आहे. याबाबत इतर महानगरपालिकेत कोणती पध्दती,निकष वापरले जातात.याची माहिती घेऊन तुलनात्मक अभ्यास करणे गरजेचे आहे. उपरोक्त प्रकरणी सविस्तर अभ्यासाअंती निर्णय घेणे संयुक्तीक वाटते.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा. उपायुक्त ( कर ) व मा.आयुक्त साो.यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

**चर्चा :**

१) मा.श्री.कानडे - यांनी नगररचना विभागाकडून ले आउटला मंजूरी दिली जाते, ती कोणत्या नियमानुसार दिली जाते. ले आउट मंजूर करताना रस्ते, गटारी, दिवाबत्ती, वृक्षारोपण इ.कामे करुन घेण्याबाबत योग्य ती अंमलबजावणी होत नसल्यामुळे सदरचा विकास निधी अंतर्गत सुधारणा करणेसाठी महापालिकेमध्ये भरुन घेणेबाबत चर्चा करणेसाठी महासभेपुढे प्रस्ताव यादी देउन पाठविलेला आहे. व सदरचा प्रस्ताव गांभिर्याने महासभेपुढे आणल्याबददल मी अभिनंदन करतो. या प्रस्तावाबाबत संपूर्ण शहरामध्ये चर्चा होत आहे. त्यामुळे या विषयाला महत्व प्राप्त झालेले आहे. याबाबत महानगरपालिकेचे लाखो रुपयांचे नुकसान होत आहे. याबाबत उदाहरणादाखल बोल्हेगांव स.नं.८४/१/२ बाबत या फाईलशी संबंध आहे. नवीन ले आउटला आपण कोणत्या नियमाच्या आधारे मंजुरी देतो. याबाबतचा खुलासा नगररचनाकार यांनी करावा व त्याची उत्तरे दयावीत. यानंतर श्री.धोंगडे, नगररचनाकार यांनी विकास कशाला म्हणतात याबाबत अधिनियमातील तरतुदीबाबतची माहिती दिली.

नगररचना विभागाकडून मंजुरी देताना एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६च्या नियमाप्रमाणे मंजुरी दिली जाते. दि.३-११-२००३ पासून विकास निधी भरुन घेण्याबाबतचा ठराव झालेला आहे. त्याप्रमाणे कार्यवाही होतआहे.

मा.श्री.कानडे - डिसेंबर २००३ पासून किती ले आउटला मंजुरी दिलेली आहे? ले आउटला मंजुरी देत असताना रस्ते, गटारी इ.विकास कामांची जबाबदारी कोणावर आहे, अशा प्रकारे विकासाची कामे केली जातात का? अनेक बेकायदेशीर ले आउट मंजूर केलेले आहेत. तसेच ग्रुप हौसिंग अर्जावर सही नसताना ले आउट मंजूर केलेला आहे. अंतिम मंजूरी न होताच बांधकाम परवानगी दिली गेली याबाबत जबाबदार असलेल्या संबंधीत कर्मचा-यास निलंबीत करण्यात यावे. संबंधीतावर कारवाई करण्यात यावी. याबाबत दिलेली अंतिम मंजुरी पडताळून पाहण्यात यावी. विकास कामाबाबतचा निधी महानगरपालिकेकडे भरुन घेणेबाबत कार्यवाही सुरु करावी.

वरील प्रकारचा विषय आम्ही देत असताना नियम वाचूनच यादया सादर करीत असतो. विकास कामे करीत असताना महानगरपालिकेकडून चेक केली जातात. अशा प्रकारे कोणत्याही कामावर पाईपलाईन, रस्ते, गटारी केल्या जात नाहीत. ओपन स्पेसला कंम्पौड केले जात नाही.

२) मा.श्री.अनंत जोशी - ज्या ज्या ठिकाणी नवीन बांधकामे झालेली आहेत, अशा काही ठिकाणी चौकशीस व पार्कींग पाहण्यास गेलो असता पैसे मागण्यास आले आहेत अशाप्रकारे म्हंटले जाते. नगरसेवकांनी वेळोवेळी दिलेल्या पत्रांना ६-६ महिने उत्तरे दिली जात नाहीत. ज्या इमारतींना पार्कींग नाही त्यांना कशाप्रकारे परवानगी दिली जाते? बांधकाम परवानगीसाठी दाखल झालेल्या अर्जावर बांधकाम मालकाची सही नाही. २९१ घरे बांधली जात आहेत. त्याठिकाणी रस्ता, ड्रेनेज, पाईपलाईन काहीही नाही.

३) मा.श्री.अभय आगरकर - नगररचना विभागाकडून ले आउट मंजूर करताना एक सही नसेल तर प्रकरण परत पाठविले जाते. निरनिराळे क्युरीज काढल्या जातात. मग याप्रकरणाला मंजुरी कशाप्रकारे दिली गेली. अंतिम मंजुरी नसताना घरांना मंजुरी कशी दिली. कोठेही ले आउट तात्पुरता असेल परवानगी दयावी, असे नाही. विकासभाराबाबत नियमावली तयार करुन त्यास शासनाची परवानगी घेउन अंमलबजावणी करावी. जोपर्यंत आरोप करणारे माफी मागत नाहीत तोपर्यंत त्यांचे एकही ले आउट मंजुर करु नये. तसेच विकास भाराची रक्कम महानगरपालिकेकडे भरुन घ्यावी.

मा.प्रभारी आयुक्त यांनी संपूर्ण चौकशी करुन एक महिन्यात कारवाई केली जाईल, असे सांगितले.

४) मा.श्री.कानडे - बोल्हेगांव मधे वस्तुस्थिती पाहता ओपनस्पेसमधे टॉवरलाईन टाकली जात आहे. याबाबत काय गौडबंगाल आहे हे कळत नाही. त्यामुळे संबंधीतावर कारवाई व्हावी. व सुधारणा विकास निधी महानगरपालिकेकडे भरुन घ्यावा.

५) मा.सौ.दहीफळे - कवडेनगरमध्ये सारडा कॉलेजमागे पांडुरंग बिल्डर्स यांनी खुली जागा सोडलेली नाही. याबाबत मा.उपायुक्त यांनी खुलासा केला की, सदर ठिकाणी २ खुल्या जागा सोडलेल्या आहेत. त्या महापालिकेकडे हस्तांतर केलेल्या नाहीत.

६) मा.श्री.अनंत जोशी - सन १९९२ च्या जीआर प्रमाणे ले आउट मधील ओपनस्पेस आपोआप महानगरपालिकेकडे हस्तांतरीत होतात.

बिल्डर्स असोसिएशनने वर्तमानपत्रातून केलेल्या आरोपाबाबत खुलासा केला की, महानगरपालिका ही स्थानिक प्रशासन संस्था असून स्वत: अधिकारक्षम आहे. मा.सदस्यांवर केलेल्या आरोपाबाबत वैयक्तिक खटला दाखल करता येउ शकतो. त्रयस्थ व्यक्तींनी स्टेटमेंट केलेले आहे ते बरोबर नाही. याबाबत बिल्डर्स असोसिएशन जबाबदार आहे. महानगरपालिका याचा निषेध करीत आहे.

७) मा.श्री.वाकळे - ले आउट मधील विकासाचे पैसे महापालिकेने भरुन घ्यावेत. ले आउट करताना ओपन स्पेसबाबत अनेक त्रुटी राहतात. ओपन स्पेस हे तुकडयातुकडयाने टाकले जातात. त्यामुळे आम्ही हा प्रश्न उपस्थित करुन विचारणा केली आहे.

८) मा.श्री.नामदेव पवार - असोसिएशनचा निषेध करावा. व कायदेशीर सल्ला घेउन त्यांचेवर कारवाई करावी.

९) मा.श्री.संदिप कोतकर - शिवनगर शिरसाठमळा या ठिकाणचा ओढा बंद करुन ले आउट टाकलेला आहे. व ओढा बुजवलेला आहे.

१०) मा.श्री.दीप चव्हाण - अंतर्गत सुधारणा बिले ब-याच प्रमाणावर पेंडींग आहेत. तसेच एका वर्षामध्ये कोटयावधी रुपयांची बीले काढली आहेत. यापूर्वी यश पॅलेसमध्ये कॉन्ट्रॅक्टरची मिटींग झाली. त्यामधे अधिकारी व पदाधिकारी यांचेबाबत समाचारमधे बातमी प्रसिध्द झालेली होती. त्याबाबत काय कारवाई केली आहे? यावर प्रभारी आयुक्त यांनी खुलासा केला की, दैनिक समाचारला नोटीस दिलेली होती. त्यानी ऐकीव माहितीवर बातमी दिली आहे. यावर मा.श्री.चव्हाण यांनी सांगितले की, नवीन हददवाढीतील ले आउट देताना खुल्या जागा सोडण्याची सक्ती केली आहे. एक महिन्यापूर्वी ले आउटला ॲमीनीटी सोडण्यास सवलत दिली आहे. ले आउटमधे पैसे भरुनही कामे केलेली दिसून येत नाही. जे जे ले आउट मंजूर झाले आहेत त्याबाबत एक कमिटी नेमून रस्ते, गटारी, दिवाबत्ती इ.नागरी सोयी केल्या आहेत कि नाही, याची पाहणी करावी. व त्याची जबाबदारी निश्चित करावी.

११) मा.श्री.बारस्कर - महापालिकेने नियमाप्रमाणे गटारी,रस्ते,लाईट करावी. व याबाबत सबकमिटी नेमावी. मा.श्री.बारस्कर यांनी बिल्डर्स यांनी केलेल्या अंतर्गत सुधारणाकामी केलेल्या कामाचे फोटो पुराव्यादाखल सादर केले.

१२) मा.श्री.गिरवले - नगरपालिका असताना नगरपालिकेकडे पैसे भरुन घेतले जात होते. व कामे केली जात होती. अंतिम मंजुरी झाल्याशिवाय ले आउटला परवानगी देउ नये. त्याचप्रमाणे ले आउट मधील कामे देताना ओपन टेंडर काढावे. तसेच यामध्ये सौर उर्जेबाबतही अटी घालाव्यात.

१३) मा.श्री.सुरेश शेळके - अंतर्गत सुधारणा कामासाठी टेंडर काढावे. नगररचना विभागाने दिलेल्या दि.२१-५-२००४च्या मंजुरीबाबत ज्याठिकाणी ओनरशिप बांधलेल्या आहेत. त्या ब-याच ठिकाणी पार्कींग नाही. बेसमेंटमध्ये गाळे काढून विकलेले आहेत. व नंतर शेजारची जागा घेउन पार्कींग दाखविलेली आहे. असे बेकायदेशीर कंम्प्लीशन कसे काय दिले आहे. याबाबत संबंधीतावर जबाबदारी राहील. शहरात अनेक ठिकाणी बेसमेंटमध्ये गाळे काढलेले आहेत. तरीसुध्दा कंम्प्लीशन दिले आहे. एकदा कंम्प्लीशन दिल्यानंतर पुन्हा रिवाईज प्लॅन कशासाठी केला जातो.

१४)  मा.श्री.नामदेव पवार - याबाबत संपूर्ण जबाबदारी नगररचना विभागाची आहे.
१५)  मा.श्री.अंबादास गारुडकर - गेल्या २ वर्षात ज्याप्रमाणे मंजुरी दिलेली आहे. याबाबत नगररचना विभागाकडील चौकशी करावी.

सुरवातीस मा.महापौर यांनी वर्तमानपत्रातून आलेल्या बातमीबाबत वैयक्तिकरित्या निषेध करतो,असे सांगितले. नंतर मा.महापौर यांनी सुचविले की, नगररचना विभागामध्ये तांत्रिक व अनुभवी स्टाफ कमी असल्यामुळे मानधनावर इंजिनिअर नेमावे. महापालिका झाल्यानंतर मागील झालेला ठराव रदद करुन ले आउटमध्ये विकासाचे पैसे भरुन घेणेबाबत कार्यवाही करावी. व ते पैसे त्याच कामावर करणेसाठी ओपन टेंडर काढण्याची कार्यवाही करावी. ले आउट मंजूर करताना गटार,पाईपलाईन,रस्ते,दिवाबत्ती इ.बाबतचे पैसे भरुन घ्यावेत. तसेच यामधे वॉटर हार्वेस्टींग व सौर उर्जेची अट घालावी. महापालिकेच्या जागेवर भाडेक-यास दिलेली बांधकाम परवानगीबाबतची चौकशी करावी. यानंतर विषय मंजूर करण्यात आला.

--*--

ठराव : या विषयावर साधक बाधक चर्चा होवून ठरविण्यांत येते की,अभिन्यास (ले आउ ट) मंजूर करतांना नियमाप्रमाणे ठरविण्यांत आलेली अंतर्गत सुधारणा रक्कम महानगरपालिका फंडात जमा करावी. सदरची रक्कम संबंधीत अभिन्यासासाठीच्या कामाकरिताच खर्च करण्यांत यावी व अभिन्यास धारकांने रक्कम महानगरपालिकेत भरणा केल्यानंतर जास्तीत जास्त २ महिन्यांचे आत सदर कामाबाबत संपूर्ण कार्यवाही अंतिमरित्या झाली पाहिजे या तत्वावर सदर विषयाबाबत प्रशासनाने उचित निर्णय घेण्यांबाबत कार्यवाही करावी. तसेच सदरची कामे जाहिर निविदा मागवून करित जावी. सध्याच्या प्रचलित पध्दतीनुसार रेखांकनाच्या तात्पुरत्या मंजुरीच्या वेळी विकासभार व अंतर्गत सुधारणा रक्कम (गटारीसाठी संपुर्ण रक्कम व रस्त्यासाठी पर्यवेक्षण शुल्क) वसुल करण्यांत येत आहे. तथापि आता सर्व अंतर्गत सुधारणेची कामे महानगरपालिका स्वत: करणांर असल्यांने अंतर्गत सुधारणेपोटीची रक्कम रेखांकन अंतिम मंजुरीच्या वेळेस वसुल करण्यांत यावी. तसेच अंतिम मंजुरी नंतर सदर भागामध्ये ट्री गार्ड बसविणे, पावसाच्या पाण्याचा निचरा होणे,सौर उत्र्जा वापर व ओपन स्पेस विकसित करणे या सर्व कामांना प्राधान्य ठेवण्यांत यावे सदरची कामे केल्यानंतरच पदाधिका-यांच्या निदर्शनांस आणावे रस्त्याचे काम झाल्यानंतर सदर जागा मालक / विकासक यांची काम पुर्ण केल्याबाबत स्वाक्षरी घेण्यांची योग्य ती तजविज करण्यांत यावी. या ठरावाबाबत मा.आयुक्त व नगर रचनाकार यांनी याबाबतच्या सर्व कायदेशीर बाबी तपासून घेवून ठरावाप्रमाणे पुढील कार्यवाही करावी.

ठराव सर्वानुमते मंजुर.
सुचक : मा.श्री.अभय आगरकर,
अनुमोदक : मा.श्री.सुरेश शेळके.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

प्रस्ताव क्रमांक : ६ दि. ११-८-२००५.

••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••

प्रस्तावाचा विषय - डॉ.श्री.जी.जी.जगताप,वैद्यकिय आरोग्याधिकारी यांचे सेवेची सध्या महानगरपालिकेस आवश्यकता नसल्याने त्यांची नेमणुक इतरत्र करणेसाठी मा.शासनास विनंती करणे बाबत मा.श्री.शेळके सुरेश छबुराव,सभागृह नेता यांची दिनांक ६-८-२००५ ची यादी.

-**-

प्रस्तावाचा मजकूर : अहमदनगर महानगरपालिके कडील वैधानिक मंजूर पदांपैकी मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी या पदावर मा.महाराष्ट्र शासन,सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी त्यांच्याकडील दिनांक ६ जुन ०५ चे बदली आदेशान्वये अहमदनगर महानगरपालिकेकडे डॉ.श्री.जी.जी.जगताप यांची प्रतिनियुक्तीने नेमणुक केलेली आहे.

महानगरपालिकेकडील आरोग्य विभागाकडे सध्या आरोग्याधिकारी,उप आरोग्याधिकारी तसेच इतर आरोग्य विभागाकडील पदांवर अधिकारी कार्यरत आहेत. महानगरपालिकेची सध्याची भौगोलिक परिस्थिती व शहरातील परिस्थिती पाहता आरोग्य विभागाकडील कामे सध्याचा कार्यरत अधिकारी वर्ग यांचेमार्फत व्यवस्थित रित्या होत असुन प्राप्त परिस्थिती मध्ये वैद्यकिय आरोग्याधिकारी यांची आवश्यकता वाटत नाही.

तरी डॉ.श्री.जी.जी.जगताप , वैद्यकिय आरोग्याधिकारी यांची नेमणुक इतरत्र करण्यांबाबत मा.शासनांस विनंती करणे आवश्यक आहे. यास्तव सदरचा विषय येत्या खास सभेपुढे निर्णयासाठी घेण्यांत यावी.याबाबत ब-याच सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे चर्चा केली असल्यांने सदरचा विषय प्राधान्याने सभेपुढे घेणे बाबत विनंती आहे.

अशाबाबतची मा.श्री.सुरेश छबुराव शेळके,सभागृह नेता,अ.नगर महानगरपालिका यांची दिनांक ६-८-२००५ रोजीची यादी पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविली.

चर्चा :

१) मा.श्री.आगरकर - यांनी सुचविले की, राजकीयदृष्टया एखादया अधिका-याबाबत ठराव करणे योग्य होणार नाही. प्रशासकीय पातळीवर निर्णय घ्यावा.

२) मा.श्री.दीप चव्हाण - महानगरपालिकेने जुन पर्यंत स्टॅपींग पॅटर्न केलेले नाही. जागा भरण्यासाठी कार्यवाही करावी. महानगरपालिकेमध्ये कार्यक्षम व्यक्ती असल्यास त्यांची नेमणूक करावी. स्टॅपींग पॅटर्न

लवकर करावा. कॅफोची केलेली मागणी रदद करावी. पाणीपटटीची बीले अदयापी दिलेली नाहीत. डिमांड रजिस्टर पूर्ण केलेले नाहीत.

३) मा.श्री.गिरवले - ठराव करण्यात येउ नये.

४) मा.श्री.सुरेश शेळके - प्रशासकीय पातळीवर निर्णय घेण्यात यावा.

**--*--**

ठराव : सदर विषयाबाबत प्रशासनाने उचित निर्णय घेणेंत यावा.

ठराव सर्वानुमते मंजुर.

सुचक : मा.श्री.अभय आगरकर

अनुमोदक : मा.श्री.सुरेश शेळके.

सही /-

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

प्रस्ताव क्रमांक : ७ दि. ११-८-२००५.

•••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••

प्रस्तावाचा विषय - मा.सभासद यांचे रजेचे अर्ज.

-**-

प्रस्तावाचा मजकूर : खालील मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविले.

| अ.नं. | मा.सदस्यांचे नांव | सभा रजेची तारीख |
|---|---|---|
| १ | श्री.खांडरे ज्ञानेश्वर सदाशिव | ११-८-२००५ |
| २ | श्री.जाधव कृष्णा दत्तात्रय | ११-८-२००५ |
| ३ | श्री.चोपडा संजय | ११-८-२००५ |

ठराव : रजेचे अर्ज मंजूर.
नोंद घेण्यांत येत आहे.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

*************************

**ठराव :** ऑफिस प्रस्तावानुसार जकात अभिकर्ता नियुक्तीस व त्यासाठीच्या अटी शर्तींना मंजुरी देण्यांत येत आहे. आयुक्तांनी त्वरीत अभिकर्ता नियुक्तीसाठी कार्यवाही करावी. सन १९९९ पुर्वी तत्कालीन नगरपरिषद व अहमदनगर कॅन्टोन्मेंट बोर्ड संयुक्तपणे जकात वसुल करत होते. त्यामुळे भविष्यात असा निर्णय झाल्यास अभिकर्ता नियुक्तीच्या अटीशर्ती मध्ये कॅन्टोन्मेंन्टला देय ठरणांरी रक्कमेपैकी ठेकेदारीच्या काळातील देय रक्कम अभिकर्त्यास अतिरिक्त रक्कम देकार रक्कमेपेक्षा जास्त द्यावी लागेल अशी अटी शर्तीत तरतूद करावी. तसेच त्यास कॅन्टोन्मेंटचे क्षेत्रात नियमानुसार जकात वसुलीचेही अधिकार देण्यांत यावेत.

सुचक : मा.श्री.दिपक वसंत सुळ.

अनुमोदक : मा.श्री.मिलिंद सदाशिव गंधे.

ठराव बहुमताने मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

दि.११-८-२००५ रोजी खास सभा चर्चा

प्रस्ताव क्रमांक : १ - मागील इतिवृत्त कायम करणे.

१) मा.श्री.गिरवले - मागील दि.१६-७-२००५ च्या सभेपुढे रस्ते विकास योजना राबविणेबाबतचा विषय घेण्यात आलेला होता. तथापी सदर विषयानुसार तज्ञ समिती अधिकारी नेमण्याचा ठराव बाबत सुचना केली असतानाही फक्त नगरसेवकांची समिती नेमण्यात आल्याचे दिसते. यामध्ये फक्त अधिकारी व पदाधिकारी यांचाच समावेश केला आहे. या समितीमधे आमदार व खासदार व नागरीकांचा समावेश करावा. तसेच सार्व.बांधकाम विभाग, बिल्डर्स असोसिएशन यांचा समावेश करावा. अन्यथा या समितीस माझा विरोध नोंदवून घेण्यात यावा.

२) मा.श्री.आगरकर - यांनी सुचविले की, या समितीमध्ये सार्व.बांधकाम विभागाचे निवृत्त अधिकारी यांचा समावेश करावा. तथापी कन्फर्मेशनला विषय आल्यानंतर विरोध नोंदविता येत नाही. जकातीबाबत बोलताना सांगितले की, व्यापा-यांशी हितगुज करुन निर्णय घ्यावा.

३) मा.श्री.कानडे - मागील विषय क्र.४ चे वेळी चर्चेत भाग घेतलेला असताना विचार व्यक्त केलेले होते. परंतु प्रोसिडींग चुकीच्या पध्दतीने लिहीले जाते. मी व्यक्त केलेले विचार प्रोसिडींगमध्ये आलेले नाहीत. तरी याबाबत खुलासा व्हावा. याबाबत मा.महापौर यांनी सुचना दिली की, टेपरेकॉर्ड कॅसेट याच्याशी टॅली करुन प्रोसिडींग लिहीण्यात यावे.

४) मा.श्री.दीप चव्हाण - यांनी मागील सभेतील खाजगीकरणातून बस सेवा चालू करण्याचे विषयाबाबत सांगितले की, परिवहन समिती अस्तित्वात नाही. त्यामुळे हा विषय कोणत्या आधारे घेतला गेला. या विषयासाठी परिवहन समितीची स्थापना करावयास पाहिजे. सदरचा विषय मागील वेळी मंजूर झाला असल्यामुळे त्याबाबत १ महिन्यापर्यंत काय कार्यवाही केली आहे, कार्यपध्दती कोणत्या स्टेजवर आहे. याबाबत मा.प्रभारी आयुक्त यांनी खुलासा केला की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ यामधील परिवहन समिती नेमण्याची तरतूद आहे. तथापी याबाबत कोणतीही बजेट तरतूद केलेली नाही. खाजगी तत्वावरच बससेवा चालविण्याचा प्रस्ताव असल्यामुळे बजेट तरतूद नाही व खर्चाचा प्रस्ताव नाही. उत्पन्न सुरु झाल्यानंतर बजेट तरतूद करण्यात येईल. बस परिवहनबाबत स्थायी समितीकडे अटी व शर्तीबाबत प्रस्ताव ठेवण्यात येउन याबाबत अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर तात्काळ कार्यवाही करण्यात येईल.

५) मा.श्री.अनंत जोशी - यांनी सांगितले की, नागरिकांचा जिव्हाळयाचा प्रश्न असताना सुध्दा बससेवा बाबत कार्यवाही झालेली नाही. नागरिकांना हालअपेष्टांना तोंड दयावे लागत आहे. बस परिवहन सेवा २० सप्टेंबर २००५ पर्यंत सुरु करावी, असे सुचविले. त्यावर उपायुक्त श्री.देशमुख साहेब यांनी सांगितले की, अटी व शर्तीबाबत त्वरीत प्रस्ताव तयार करुन स्थायी समितीपुढे ठेवून निविदा प्रक्रिया पार पाडण्यात येईल.

६) मा.सौ.मंगला गुंदेचा - महिला व बाल कल्याण समितीचे सभापतींना वाहन देण्यात यावे. याबाबत मा.महापौर यांनी सांगितले की, यापूर्वी बजेटचा प्रश्न होता. पुढील मिटींगपूर्वी वाहन उपलब्ध करुन देण्यात यावे, असे सांगितले.

७) मा.सौ.दहिफळे - यांनी सुचविले की, महिला व बाल कल्याण समितीचे सभापतींना सिटी इंजिनिअर यांचेप्रमाणे भाडयाने वाहन देणे किंवा स्वतःची गाडी वापरली तर भत्ता देण्यात यावा.

वरील चर्चेनंतर मागील इतिवृत्त मंजूर करण्यात आले.

| अ.नं. | विषय |
|---|---|
| १ | मगनलाल बोरा,यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| २ | मनाजी भुजबळ, यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ३ | रमेश रासकर , यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ४ | निवृत्त फौजदार भिंगारदिवे , यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ५ | परमेश्वरी बाई राजाणी , यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ६ | अहिल्याबाई बगाडे , यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ७ | सौ.राधिका पटवा, यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ८ | कमलाबाई जैन यांचे संथारा व्रतात, दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ९ | लावणी सम्राज्ञी रोशन सातारकर, यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |

| | |
|---|---|
| १० | सुरजमलजी सोनग्रा , यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ११ | गोकुळदास चंगेडिया, यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| १२ | लक्ष्मण साळुंखे , यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| १३ | दत्तात्रय रासने, यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| १४ | जानकीबाइ ऋषी , यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| १५ | अंबादास सैंदर, यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| १६ | माणिकबाई चोपडा, यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| १७ | संजय सिद्दम, यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| १८ | शालिनी तांबोळी, यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| १९ | शंकरराव गोडबोले, यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| २० | चिंतामणी विप्रदास, यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| २१ | वसंत ननावरे, यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| २२ | डॉ.दादी केरावला,यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २३ | विठ्ठल (नाना) लांडगे,यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २४ | नागनाथ जठार,यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २५ | दत्तात्रय रासने,यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २६ | श्रीमती.इंदिरा भगवान जोशी,यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २७ | रावतमल साखला,यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २८ | देविकाबाई भाटे,यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २९ | बंडोपंत गोसावी,यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३० | रतिलाल गांधी,यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३१ | एस.एम.कांबळे, यांचे दु:खद निधनानिमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ३२ | समाजभूषण नामदेवराव राजगुरु, यांचे दु:खद निधनानिमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ३३ | मोहनलालजी राका, यांचे दु:खद निधनानिमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ३४ | नर्मदाबाई फुलसौंदर, यांचे दु:खद निधनानिमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ३५ | पानकंवरबाई कटारिया, यांचे दु:खद निधनानिमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ३६ | महेश सावंत, यांचे दु:खद निधनानिमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ३७ | कौशल्या काळे, यांचे दु:खद निधनानिमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ३८ | कृष्णाजी बावधाने, यांचे दु:खद निधनानिमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ३९ | राजम्मा कोटा, यांचे दु:खद निधनानिमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ४० | शशिकांत पालवे, यांचे दु:खद निधनानिमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ४१ | राहुल धुप्पड, यांचे दु:खद निधनानिमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ४२ | खा.प्रकाशबापू पाटील, यांचे दु:खद निधनानिमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ४३ | दुर्गाबाई मुथा , यांचे दु:खद निधनानिमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ४४ | रमेश धनेश्वर, यांचे दु:खद निधनानिमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ४५ | बाळकृष्ण दिघे, यांचे दु:खद निधनानिमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ४६ | लक्ष्मणराव काळे, यांचे दु:खद निधनानिमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |

| | |
|---|---|

प्रस्ताव क्रमांक : २ - दुखवटयाचे प्रस्ताव.

१) मा.श्री.कानडे - महाराष्ट्रामध्ये विविध ठिकाणी महापुरामुळे भयानक परिस्थीती उदभवून नागरीकांना हालअपेष्टांना तोंड दयावे लागत आहे. व बरेच नागरीक पुरामध्ये वाहून गेले आहेत. देशातून मदतीचा ओघ चालू आहे. त्याचप्रमाणे शिर्डी संस्थानने ५ कोटी  रुपये दिलेले आहेत. त्याबाबत त्यांचे अभिनंदनास ते पात्र आहेत. त्याचप्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेच्या जलतरण तलावामध्ये मयूर क्षिरसागर या युवकाचा बुडून मृत्यु झाला. त्यांच्या कुटुंबीयाची अवस्था वाईट झालेली आहे. त्यांच्या कुटुंबीयांना आपण कोणतीही मदत केलेली नाही. तेव्हा त्यांच्या कुटुंबीयांना महानगरपालिकेने रु.१ लाख मदत करावी, असे सुचविले. यापुर्वी महानगरपालिकेने काही संस्थांना ५१ हजार रुपयांची मदत दिलेली आहे. तेव्हा या युवकाला श्रध्दांजली म्हणून मदत करावी. यावर उपायुक्त यांनी सांगितले की, तांत्रिक बाजू तपासून घ्यावी लागेल. त्यावर मा.महापौर यांनी सांगितले की, तांत्रिक बाजू सभागृहाच्या भावना लक्षात घेउन तपासून पहावे. यावर मा.श्री.मुदस्सर शेख यांनी सदस्यांच्या मानधनातून रु.५००/- मदत देण्याचे सुचीत केले.

२) मा.श्री.दीप चव्हाण यांनी सांगितले की, तांत्रिक बाजू बाजूला ठेवावी. यावर मा.श्री.कानडे यांनी सांगितले की, तांत्रिक मुददे उपस्थित केले जातात. तथापी या कुटुंबाच्या हालअपेष्टा समजून घेतल्या जात नाहीत. त्याचप्रमाणे जलतरण चालविणा-या संस्थेने काय कार्यवाही केली याची चर्चा करावी. यावर मा.श्री.आगरकर यांनी सांगितले की, मुळ दुखवटयाच्या प्रस्तावाबाबत श्रध्दांजलीचा विषय बाजूला जात आहे. मा.श्री.गारुडकर यांनी सांगितले की, जलतरण तलाव ज्या एजन्सीला चालविण्यास दिलेला आहे त्यांनी इन्शुरन्सची व्यवस्था केली आहे की नाही, याची विचारणा केली आहे काय?

३) मा.श्री.कैलास गिरवले - यापुर्वी सुनामी पुरग्रस्तांसाठी महानगरपालिका कर्मचा-यांनी मदत दिलेली आहे. परंतु मा.नगरसेवकांनी अशा संकटाचे वेळी मदत करावी असे म्हंटले होते. परंतु मदत केलेली नाही. तेव्हा मनापासून अशा प्रकारे मदत करावी.

यानंतर दुखवटयाचे ठराव मंजूर करण्यात आले.

प्रस्ताव क्रमांक : ३ - जकात वसुली अभिकर्ता नेमणेबाबत.

१) मा.श्री.सुळ - जकात अभिकर्ता नेमणेचा विषय घेतलेला आहे. याबाबतच्या अटी व शर्तीमधील ठेक्याची देकार रक्कम ३३ कोटी ११ लाख ६३ हजार ३०८ घेतलेली आहे. त्याचप्रमाणे जकात नाके चालविण्यासाठी महानगरपालिका आस्थापनेवरील ५० टक्के कर्मचारी घ्यावेत, असे सुचविले. दि.२८ ऑगस्ट पासून वसुलीसाठी अभिकर्ता नेमला न गेल्यास वसुली कशी करणार. वसुली महानगरपालिकेने केली तरच देकार रकमेचा प्रश्न येईल. त्यावर मा.प्रभारी आयुक्त यांनी खुलासा केला की, जकात ठेकेदार यांना महानगरपालिकेचे कर्मचारी घेणेबाबत सक्ती करता येत नाही.

२) मा.श्री.गव्हाळे - महानगरपालिकेकडे कर्मचारी असताना जकात ठेका कशासाठी दयावयाचा? त्यावर मा.महापौर यांनी याबाबत खुलासा केला की, इतर महानगरपालिकांच्या जकात उत्पन्नाबाबतचा विचार केलाअसता जास्त रक्कम मिळु शकते. त्यामुळे वसुलीबाबतचा ठेका देणे योग्य आहे, असे सांगितले.

३) मा.श्री.मुदस्सर शेख - वसुलीबाबत ठेकेदाराकडून व्यापा-यांना त्रास होत असल्यामुळे महानगरपालिकेने स्वत: जकात वसुली करावी. अन्यथा ठेकेदाराकडून वसुली करणेसाठी आमचा विरोध नोंदवावा.

४) मा.श्री.दीप चव्हाण - मा.शासनाने फक्त नियमांना मंजुरी दिलेली आहे. त्यामुळे जकात लावता येत नाही. मनपा कायदा कलम १०४ अन्वये स्थायी समितीपुढे प्रस्ताव पाठविलेला होता. तेव्हा सर्वसाधारण सभेपुढे घेतलेला विषय बेकायदेशीर आहे. त्यास आमचा विरोध आहे. त्यावर प्रभारी आयुक्त यांनी खुलासा केला की, प्रस्ताव स्थायी समितीपुढे सादर करण्यात आला होता. असे सांगितले होते. त्यावर मा.श्री.दीप चव्हाण यांनी सांगितले की चुकीच्या पध्दतीने निर्णय झालेला असेल तर विरोध करण्याची आम्हाला हौस नाही. शासनाकडून आलेले पत्रानुसार जकात नियमांना मंजुरी आलेली आहे. त्यामुळे जकात लावता येत नाही. हा विषय बेकायदेशीर आहे. त्यास आमचा विरोध आहे.

इतर महानगरपालिकांमध्ये जकातीबाबत ठरावीक लोकच ठेका घेतात. व ते नागरीक व व्यापारी यांना त्रास देतात, असा अनुभव आहे. त्यामुळे अभिकर्ता नेमण्यास आमचा विरोध आहे. नगरसेवकांना ज्या वेळेस टेंडर फॉर्मच्या नमुने पाठविण्यात आले आहेत. हे नमुने इंग्रजीमध्ये आहे. हे नमुने आत्ताच का पाठविण्यात आले. यापुर्वी असे टेंडर फॉर्म नमुने पाठविले जात नव्हते. मराठीमध्ये नमुने का पाठविले नाही? यावर मा.प्रभारी आयुक्त यांनी असा खुलासा केला की, जकातीबाबतच्या टेंडरचा वेगळा विषय असल्यामुळे मुददाम माहितीसाठी पाठविण्यात आला आहे. कलम १२७ (२) नुसार पत्राने शासनाने स्पष्ट केले आहे की, १ महिन्यानंतर जकात लावण्यास महानगरपालिका सक्षम आहे. तरीही आमचा विरोध नोंदवून घ्यावा, असे मा.श्री.दीप चव्हाण यांनी सांगितले.

५) मा.सौ.मंगला गुंदेचा - ठेका पध्दतीने दिल्यास व्यापा-यास त्रास होईल. तरी जकात महानगरपालिकेने वसुल करावी. त्यावर मा.महापौर यांनी सांगितले की, कोणासही त्रास होणार नाही अशा प्रकारे दक्षता घेउ.

६) मा.श्री.कैलास गिरवले - अभिकर्ता नेमणेबाबत आमची मागणी आहे. कोणाचा विरोध असल्यास तो नोंदवून घेण्यात यावा. महानगरपालिकेने जकात नाके चालवून वसुली करणे हा दुर्दैवी प्रकार होईल. व प्रामाणीक कर्मचारी यांचे जिवाशी खेळ होईल. अपेक्षीत उत्पन्न मिळणार नाही. यापुर्वी जकात चोरीच्या अनेक घटना घडल्या. व कर्मचा-यांचे जिवावर बेतले आहे. व्यापा-यांशी याबाबत चर्चा केली आहे. ठेकेदारी पध्दतीनेच जकात वसुल करावी,असे त्यांचे मत आहे. व्यापारी स्वत: जकात भरीत नाही. त्यामुळे अभिकर्त्यामार्फतच जकात वसुली करावी,असे मत आहे.

७) मा.श्री.अनंत जोशी - ठेकेदारामार्फत जकात वसुली करीत असताना त्यांचे वर्तनाबाबत आदर्श आचार संहिता लावण्यात यावी. त्यामुळे हा प्रश्न निर्माण होणार नाही.

८) मा.श्री.अभय आगरकर - यांनी २ सुचना मांडल्या. १.कॅन्टोन्मेंट बोर्डाचे हददीमध्ये नगरपालिकेच्या वतीने जकात वसुली केली जात होती. व त्याबाबत कॅन्टोन्मेंटला मोबदला देण्यात येत होता. यापूर्वी वार्षिक ५० लाख रुपये शेवटी मोबदला देण्यात येत होता. त्याबाबत आताच्या प्रस्तावामध्ये प्रोव्हीजन केलेली नाही असे दिसून येते. त्याबाबतही योग्य तो निर्णय घ्यावा. २.अभिकर्ता नेमल्यानंतर एस.टी.स्टॅण्ड, रेल्वेस्टेशन इ. ठिकाणी महिला व नागरिकांचे बॅगा तपासणे याबाबत अडवणूक होउ नये यासाठी आचारसंहिता करावी व त्याची दखल घ्यावी, अशी विनंती केली.

९) मा.श्रीमती.दिघे - ठेकेदारी पध्दतीने जकात वसुल करु नये. महिलांना रात्री अपरात्री त्रास होईल.

१०) मा.श्री.नामदेव पवार - जकात ठेकेदारी पध्दतीने देण्यासाठी काही अटी व शर्ती आहेत काय? आचार संहिता केलेली आहे काय? नियमावली केलेली आहे काय? असे विचारण्यात आले. यावर प्रभारी आयुक्त यांनी खुलासा केला की, नियमामध्ये सर्व तरतूद केली आहे.

११) मा.श्री.उडाणशिवे - यांनी सांगितले की, अन्नधान्य, भाजीपाला, दूध हे जकातीमधून वगळणेत यावेत. त्याचप्रमाणे ठेकेदारीने जकात वसुल करण्यास विरोध आहे.
१२) मा.श्री.संदिप कोतकर - कोणत्या वस्तु जकातीमधून वगळावयाच्या यावर चर्चा करणार आहे किंवा कसे? यावर मा.महापौरयांनी खुलासा केला की, कोणत्या वस्तू वगळलेल्या आहेत. त्याची अनुसुची २ मध्ये यादी दिलेली आहे. आता फक्त अभिकर्ता नेमणेबाबत निर्णय घ्यावयाचा आहे.
१३) मा.श्री.त्रिपाठी - महानगरपालिकेकडे २७५० कर्मचारी आहेत. महानगरपालिका ठेका देणारच आहे. तेव्हा महानगरपालिकेचे कर्मचारी वसुलीकामी नेमण्यात यावेत. महापौर यांनी नोंद करणेबाबत सुचना दिली.
१४) मा.श्री.मिलींद गंधे - अभिकर्ता नेमणेबाबत मांडलेल्या प्रस्तावास अनुमोदन देउन सदर प्रस्ताव मंजूर करावा असे सांगितले.

शेवटी मा.महापौर यांनी मा.सदस्यांनी मांडलेल्या सर्व सुचना लक्षात घेउन ठेकेदारी पध्दतीचा कोणताही त्रास होणार नाही, अशा अटी व शर्ती नमूद करुन तसेच कॅन्टोन्मेंट बाबत योग्य तो विचार करुन सदरचा प्रस्ताव मंजूर करण्यात यावा असे आवाहन केले. व मंजूर झाल्याचे जाहीर केले.

प्रस्ताव क्रमांक : ४ - महिला व बाल कल्याण समितीला अंतिम निर्णयाचे अधिकार देणेबाबत.
१) मा.श्री.सुरेश शेळके - यांनी सांगितले की, या प्रस्तावाबाबत धुळे, मालेगांव, जळगांव इ. महापालिकांकडे माहिती घेउन शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करुन घेण्याबाबत सुचविले. त्यानंतर मा.श्री.मिलींद गंधे यांनी सदर प्रस्तावास अनुमोदन दिले.

प्रस्ताव क्रमांक : ५ - अभिन्यास (ले आउट) मंजूर करताना ठरविलेली अंतर्गत सुधारणा रक्कम महानगरपालिकेत भरणेबाबत.

२) मा.श्री.कानडे - यांनी नगररचना विभागाकडून ले आउटला मंजूरी दिली जाते, ती कोणत्या नियमानुसार दिली जाते. ले आउट मंजूर करताना रस्ते, गटारी, दिवाबत्ती, वृक्षारोपण इ.कामे करुन घेण्याबाबत योग्य ती अंमलबजावणी होत नसल्यामुळे सदरचा विकास निधी अंतर्गत सुधारणा करणेसाठी महापालिकेमध्ये भरुन घेणेबाबत चर्चा करणेसाठी महासभेपुढे प्रस्ताव यादी देउन पाठविलेला आहे. व सदरचा प्रस्ताव गांभिर्याने महासभेपुढे आणल्याबददल मी अभिनंदन करतो. या प्रस्तावाबाबत संपूर्ण शहरामध्ये चर्चा होत आहे. त्यामुळे या विषयाला महत्व प्राप्त झालेले आहे. याबाबत महानगरपालिकेचे लाखो रुपयांचे नुकसान होत आहे. याबाबत उदाहरणादाखल बोल्हेगांव स.नं.८४/१/२ बाबत या फाईलशी संबंध आहे. नवीन ले आउटला आपण कोणत्या नियमाच्या आधारे मंजुरी देतो. याबाबतचा खुलासा नगररचनाकार यांनी करावा व त्याची उत्तरे दयावीत. यानंतर श्री.धोंगडे, नगररचनाकार यांनी विकास कशाला म्हणतात याबाबत अधिनियमातील तरतुदीबाबतची माहिती दिली.

नगररचना विभागाकडून मंजुरी देताना एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६च्या नियमाप्रमाणे मंजुरी दिली जाते. दि.३-११-२००३ पासून विकास निधी भरुन घेण्याबाबतचा ठराव झालेला आहे. त्याप्रमाणे कार्यवाही होतआहे.

मा.श्री.कानडे - डिसेंबर २००३ पासून किती ले आउटला मंजुरी दिलेली आहे? ले आउटला मंजुरी देत असताना रस्ते, गटारी इ.विकास कामांची जबाबदारी कोणावर आहे, अशा प्रकारे विकासाची कामे केली जातात का? अनेक बेकायदेशीर ले आउट मंजूर केलेले आहेत. तसेच ग्रुप हौसिंग अर्जावर सही नसताना ले आउट मंजूर केलेला आहे. अंतिम मंजूरी न होताच बांधकाम परवानगी दिली गेली याबाबत जबाबदार असलेल्या संबंधीत कर्मचा-यास निलंबीत करण्यात यावे. संबंधीतावर कारवाई करण्यात यावी. याबाबत दिलेली अंतिम मंजुरी पडताळून पाहण्यात यावी. विकास कामाबाबतचा निधी महानगरपालिकेकडे भरुन घेणेबाबत कार्यवाही सुरु करावी.

वरील प्रकारचा विषय आम्ही देत असताना नियम वाचूनच यादया सादर करीत असतो. विकास कामे करीत असताना महानगरपालिकेकडून चेक केली जातात. अशा प्रकारे कोणत्याही कामावर पाईपलाईन, रस्ते, गटारी केल्या जात नाहीत. ओपन स्पेसला कंम्पौड केले जात नाही.

२) मा.श्री.अनंत जोशी - ज्या ज्या ठिकाणी नवीन बांधकामे झालेली आहेत, अशा काही ठिकाणी चौकशीस व पार्कींग पाहण्यास गेलो असता पैसे मागण्यास आले आहेत अशाप्रकारे म्हंटले जाते. नगरसेवकांनी वेळोवेळी दिलेल्या पत्रांना ६-६ महिने उत्तरे दिली जात नाहीत. ज्या इमारतींना पार्कींग नाही त्यांना कशाप्रकारे परवानगी दिली जाते? बांधकाम परवानगीसाठी दाखल झालेल्या अर्जांवर बांधकाम मालकाची सही नाही. २९१ घरे बांधली जात आहेत. त्याठिकाणी रस्ता, ड्रेनेज, पाईपलाईन काहीही नाही.

३) मा.श्री.अभय आगरकर - नगररचना विभागाकडून ले आउट मंजूर करताना एक सही नसेल तर प्रकरण परत पाठविले जाते. निरनिराळे क्युरीज काढल्या जातात. मग याप्रकरणाला मंजुरी कशाप्रकारे दिली गेली. अंतिम मंजुरी नसताना घरांना मंजुरी कशी दिली. कोठेही ले आउट तात्पुरता असेल परवानगी दयावी, असे नाही. विकासभाराबाबत नियमावली तयार करुन त्यास शासनाची परवानगी घेउन अंमलबजावणी करावी. जोपर्यंत आरोप करणारे माफी मागत नाहीत तोपर्यंत त्यांचे एकही ले आउट मंजुर करु नये. तसेच विकास भाराची रक्कम महानगरपालिकेकडे भरुन घ्यावी.

मा.प्रभारी आयुक्त यांनी संपूर्ण चौकशी करुन एक महिन्यात कारवाई केली जाईल, असे सांगितले.

४) मा.श्री.कानडे - बोल्हेगांव मधे वस्तुस्थिती पाहता ओपनस्पेसमधे टॉवरलाईन टाकली जात आहे. याबाबत काय गौडबंगाल आहे हे कळत नाही. त्यामुळे संबंधीतावर कारवाई व्हावी. व सुधारणा विकास निधी महानगरपालिकेकडे भरुन घ्यावा.

५) मा.सौ.दहीफळे - कवडेनगरमध्ये सारडा कॉलेजमागे पांडुरंग बिल्डर्स यांनी खुली जागा सोडलेली नाही. याबाबत मा.उपायुक्त यांनी खुलासा केला की, सदर ठिकाणी २ खुल्या जागा सोडलेल्या आहेत. त्या महापालिकेकडे हस्तांतर केलेल्या नाहीत.

६) मा.श्री.अनंत जोशी - सन १९९२ च्या जीआर प्रमाणे ले आउट मधील ओपनस्पेस आपोआप महानगरपालिकेकडे हस्तांतरीत होतात.

बिल्डर्स असोसिएशनने वर्तमानपत्रातून केलेल्या आरोपाबाबत खुलासा केला की, महानगरपालिका ही स्थानिक प्रशासन संस्था असून स्वत: अधिकारक्षम आहे. मा.सदस्यांवर केलेल्या आरोपाबाबत वैयक्तिक खटला दाखल करता येउ शकतो. त्रयस्थ व्यक्तींनी स्टेटमेंट केलेले आहे ते बरोबर नाही. याबाबत बिल्डर्स असोसिएशन जबाबदार आहे. महानगरपालिका याचा निषेध करीत आहे.

७) मा.श्री.वाकळे - ले आउट मधील विकासाचे पैसे महापालिकेने भरुन घ्यावेत. ले आउट करताना ओपन स्पेसबाबत अनेक त्रुटी राहतात. ओपन स्पेस हे तुकडयातुकडयाने टाकले जातात. त्यामुळे आम्ही हा प्रश्न उपस्थित करुन विचारणा केली आहे.

८) मा.श्री.नामदेव पवार - असोसिएशनचा निषेध करावा. व कायदेशीर सल्ला घेउन त्यांचेवर कारवाई करावी.

९) मा.श्री.संदिप कोतकर - शिवनगर शिरसाठमळा या ठिकाणचा ओढा बंद करुन ले आउट टाकलेला आहे. व ओढा बुजवलेला आहे.

१०) मा.श्री.दीप चव्हाण - अंतर्गत सुधारणा बिले ब-याच प्रमाणावर पेंडींग आहेत. तसेच एका वर्षामध्ये कोटयावधी रुपयांची बीले काढली आहेत. यापूर्वी यश पॅलेसमध्ये कॉन्ट्रॅक्टरची मिटींग झाली. त्यामधे अधिकारी व पदाधिकारी यांचेबाबत समाचारमधे बातमी प्रसिध्द झालेली होती. त्याबाबत काय कारवाई केली आहे? यावर प्रभारी आयुक्त यांनी खुलासा केला की, दैनिक समाचारला नोटीस दिलेली होती. त्यानी ऐकीव माहितीवर बातमी दिली आहे. यावर मा.श्री.चव्हाण यांनी सांगितले की, नवीन हददवाढीतील ले आउट देताना खुल्या जागा सोडण्याची सक्ती केली आहे. एक महिन्यापूर्वी ले आउटला ॲमीनीटी सोडण्यास सवलत दिली आहे. ले आउटमधे पैसे भरुनही कामे केलेली दिसून येत नाही. जे जे ले आउट मंजूर झाले आहेत त्याबाबत एक कमिटी नेमून रस्ते, गटारी, दिवाबत्ती इ.नागरी सोयी केल्या आहेत कि नाही, याची पाहणी करावी. व त्याची जबाबदारी निश्चित करावी.

११) मा.श्री.बारस्कर - महापालिकेने नियमाप्रमाणे गटारी,रस्ते,लाईट करावी. व याबाबत सबकमिटी नेमावी. मा.श्री.बारस्कर यांनी बिल्डर्स यांनी केलेल्या अंतर्गत सुधारणाकामी केलेल्या कामाचे फोटो पुराव्यादाखल सादर केले.

१२) मा.श्री.गिरवले - नगरपालिका असताना नगरपालिकेकडे पैसे भरुन घेतले जात होते. व कामे केली जात होती. अंतिम मंजुरी झाल्याशिवाय ले आउटला परवानगी देउ नये. त्याचप्रमाणे ले आउट मधील कामे देताना ओपन टेंडर काढावे. तसेच यामध्ये सौर उर्जेबाबतही अटी घालाव्यात.

१३) मा.श्री.सुरेश शेळके - अंतर्गत सुधारणा कामासाठी टेंडर काढावे. नगररचना विभागाने दिलेल्या दि.२१-५-२००४च्या मंजुरीबाबत ज्याठिकाणी ओनरशिप बांधलेल्या आहेत. त्या ब-याच ठिकाणी पार्कींग नाही. बेसमेंटमध्ये गाळे काढून विकलेले आहेत. व नंतर शेजारची जागा घेउन पार्कींग दाखविलेली आहे. असे बेकायदेशीर कंम्प्लीशन कसे काय दिले आहे. याबाबत संबंधीतावर जबाबदारी राहील. शहरात अनेक ठिकाणी बेसमेंटमध्ये गाळे काढलेले आहेत. तरीसुध्दा कंम्प्लीशन दिले आहे. एकदा कंम्प्लीशन दिल्यानंतर पुन्हा रिवाईज प्लॅन कशासाठी केला जातो.

१४) मा.श्री.नामदेव पवार - याबाबत संपूर्ण जबाबदारी नगररचना विभागाची आहे.

१५) मा.श्री.अंबादास गारुडकर - गेल्या २ वर्षात ज्याप्रमाणे मंजुरी दिलेली आहे. याबाबत नगररचना विभागाकडील चौकशी करावी.

सुरवातीस मा.महापौर यांनी वर्तमानपत्रातून आलेल्या बातमीबाबत वैयक्तिकरित्या निषेध करतो,असे सांगितले. नंतर मा.महापौर यांनी सुचविले की, नगररचना विभागामध्ये तांत्रिक व अनुभवी स्टाफ कमी असल्यामुळे मानधनावर इंजिनिअर नेमावे. महापालिका झाल्यानंतर मागील झालेला ठराव रदद करुन ले आउटमध्ये विकासाचे पैसे भरुन घेणेबाबत कार्यवाही करावी. व ते पैसे त्याच कामावर करणेसाठी ओपन टेंडर काढण्याची कार्यवाही करावी. ले आउट मंजूर करताना गटार,पाईपलाईन,रस्ते,दिवाबत्ती इ.बाबतचे पैसे भरुन घ्यावेत. तसेच यामधे वॉटर हार्वेस्टींग व सौर उर्जेची अट घालावी. महापालिकेच्या जागेवर भाडेक-यास दिलेली बांधकाम परवानगीबाबतची चौकशी करावी. यानंतर विषय मंजूर करण्यात आला.

प्रस्ताव क्रमांक : ६ - मुख्य वैदयकीय आरोग्याधिकारी यांची नेमणूक इतरत्र करणेबाबत.

१) मा.श्री.आगरकर - यांनी सुचविले की, राजकीयदृष्टया एखादया अधिका-याबाबत ठराव करणे योग्य होणार नाही. प्रशासकीय पातळीवर निर्णय घ्यावा.

२) मा.श्री.दीप चव्हाण - महानगरपालिकेने जुन पर्यंत स्टॅपींग पॅटर्न केलेले नाही. जागा भरण्यासाठी कार्यवाही करावी. महानगरपालिकेमध्ये कार्यक्षम व्यक्ती असल्यास त्यांची नेमणूक करावी. स्टॅपींग पॅटर्न लवकर करावा. कॅफोची केलेली मागणी रदद करावी. पाणीपटटीची बीले अदयापी दिलेली नाहीत. डिमांड रजिस्टर पूर्ण केलेले नाहीत.

३) मा.श्री.गिरवले - ठराव करण्यात येउ नये.

४) मा.श्री.सुरेश शेळके - प्रशासकीय पातळीवर निर्णय घेण्यात यावा.